# प्रकरण चौथे

## "बारी" व "माझा गाव" : तुलनात्मक अभ्यास

## प्रकरण चौथे

## "बारी" व "माझा गाव" तुलनात्मक अभ्यास

अ नु क्र म णि का


१) प्रस्तावना

२) "बारी" व "माझा गाव" : कथासूत्र

३) "बारी" व "माझा गाव" : आशयसूत्र

४) "बारी" व "माझा गाव" : व्यक्तिचित्रणांची वैशिष्ट्ये

५) "बारी" व "माझा गाव" : सामाजिक चित्रण

६) "बारी" व "माझा गाव" : भाषाशैलीचे वैशिष्ट्ये

७) "बारी" व "माझा गाव" : निवेदन शैलीचे वैशिष्ट्ये

८) सा रां श

९) सं द र्भ


.......

# प्रकरण चौथे

## "बारी" व "माझा गाव" : तुलनात्मक अभ्यास

रणजित देसाई यांनी "बारी" आणि"माझा गाव" या दोन कादंब-या एकापाठोपाठ लिहिल्या आहेत. "बारी" कादंबरी बेरड जमातीच्या जीवनाचे चित्रण करणारी आहे. तर "माझा गाव" ही कादंबरी एका गावातील वेगवेगळया माणसांच्या जीवनाचे चित्रण करणारी आहे. प्रस्तुत प्रकरणात या दोन्ही कादंब-यांचा तौलनिक अभ्यास करावयाचा आहे. हा अभ्यास करताना या कादंब-यांचे कथानक, आशयसूत्र, व्यक्तिचित्रण, समाजजीवनाचे चित्रण, भाषाशैली, निवेदन ही वैशिष्टये नजरेसमोर येऊन कोणत्या कादंबरीत ती नीटपणे व्यक्त होतात, अगर नीटपणे व्यक्त होत नाहीत. त्याची कारणे कोणती इत्यादी गोष्टींचा विचार करून, या दोन्ही कादंब-यांपैकी कोणती कादंबरी वाङ्.मयदृष्टया अधिक चांगली समजता येईल याचा विचार करावयाचा आहे.

### "बारी" व "माझा गाव" कथासूत्र :

एका उपेक्षित बेरड जमातीच्या जीवनात स्वतंत्र प्राप्तीनंतर कोणता बदल होतो. हे "बारी" कादंबरीचे कथासूत्र आहे. तर परंपरागत खेडेगावातील सरकारी इनामदार घराणे, आणि त्या घराण्यावर आधारीत असलेले खेडेगावातील लोक हे "माझा गाव" कादंबरीचे कथासूत्र आहे. या दोन्ही कादंबरींच्या कथासूत्रांची अखेरही शोकात्म आहे. "बारी" कादंबरीच्या शेवटी बदलत्या जीवनाशी तोण्यासारख्या जुन्या विचाराच्या बेरडांना मिळते-जुळते घेता येत नाही. त्यामुळे त्यांच्या विषयी वाटणारी हळहळ दुःखदायक वाटते. तसेच "माझा गाव" कादंबरीच्या शेवटी एका पाठोपाट तीन माणसांचा मृत्यु होतो. म्हणून हाही शेवट दुःखदायक वाटतो. पण "बारी" कादंबरीच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

कथासूत्राची गुंफण प्रत्ययकारी झाली आहे. त्यामुळे "माझा गाव" कादंबरी पेक्षा "बारी" कादंबरी चांगली ठरते.

"बारी" कादंबरीच्या कथानकात लेखकाने नेमका प्रकाश बेरड जीवनावर टाकला आहे. जंगलाचा आधार घेऊन जाटगा-या करणे. दिला शब्द पाळणे. हा बेरड जमातीचा स्वभाव गुणधर्म. त्यासाठीच तेग्याने पाटलाचा व आपला मित्र चंद्रोजीचा खून केला. म्हणूनच त्याला शिक्षा भोगावी लागली. शिक्षा भोगून आल्यावर तेग्या बदलत्या जीवनामुळे एकाकी पडतो. हा तेग्या परंपरावादी बेरड समाजाचा प्रतिनिधी आहे. या समाजाला नव्या जीवनाचा स्पर्शही झालेला नाही. म्हणूनच ही जमात पिढयान्-पिढया तशीच राहात आली आणि जगत आली. मात्र स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदलत्या परिस्थितीत या बेरड जमातीला जुन्या काळाने जगता येत नाही. त्यामुळे या जमातीला आपआपसात संघर्ष करावा लागतो. हा संघर्ष आधुनिक विचाराशी सहमत असणारा ईश्वरा व त्याचे तरुण साथीदार. यांच्याविरुद्ध परंपरावादी तेग्या आणि त्याचे जुने जोडीदार यांच्यात आहे. यातील ईश्वरा हा कादंबरीकारांनी बदलत्या जीवनातला नव्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून आणला आहे.

त्यामुळे ही कादंबरी तेग्याच्या व्यक्तिमत्त्वाची शोकांतिका म्हणून पाहिली जाते. तेग्या प्रमाणेच जुने बेरड एकाकी पडतात. त्यांनाही नवीन जीवनाशी समरस होता येत नाही. म्हणून लेखकाने अशा जमातीचे उध्वस्त होऊ पाहणारे जीवन, आणि जगण्याची धडपड करणारे जीवन नेमक्या शब्दातून मांडले आहे. असा हा समाज जेव्हा उध्वस्त होऊ लागतो तेव्हा त्याच्या विषयी वाटणारी हळहळ दुःखदायक वाटते. त्यामुळे हा शेवट शोकात्म वाटतो.

याच बरोबर "माझा गाव" कादंबरीमध्ये रणजित देसाईंनी स्वातंत्र्य-पूर्व काळातील एक जुनं खेडेगाव चित्रित केल आहे. या जुन्या गावामध्ये असणारे इनामदारी घराणे, त्या घराण्याचा सर्व गावावर असणारा जरब. तसेच गावातील लोकांचा या इनामदार घराण्यावर असणारा विश्वास, श्रध्दा. या विश्वासापोटी, श्रध्देपोटी इनामदारांची सेवा-चाकरी करणारे गावातील परंपरागत वृत्तीचे लोक गावातील चालत आलेले परंपरागत पध्दतीचे रीतीरिवाज त्याकरीता गावक-यांनी मिळून जत्रेला जाण. जत्रेत इनामदारांच्या हस्ते पहिलं बकर देण्याचा मान. तसेच दस-यात सोनं लुटण्याचा असणारा इनामदारांचा मान. अस हे गाव जुन्या संकेताप्रमाणे एकसंघ जीवन जगत असत. पण मधेच हौसा-रावबा प्रकरणातून गावात दुफळी निर्माण होते आणि आत...र्यंत इनामदार घराण्याचा मान राखणारा गाव आप्पासाहेबांच्या विरूध्द होतो. यासाठी आप्पासाहेब, तात्या व गावकरी यांना कोर्ट-कचे-या खेळाव्या लागतात. नंतर मात्र पुर्ववत गाव शांत होतो. आणि आप्पासाहेब गावच्या प्रेमापोटी परत कामाला लागतात. म्हणूनच दुष्काळ प्रसंगी आप्पासाहेब वाड्यातील धान्य गावातील लोकांना वाटतात. त्यातूनही धान्य कमी पडतात म्हणून तारणीकरांच्याकडून कर्ज घेतात. पण धान्य कमी पडू देत नाहीत. तसेच पटकीच्या साथीच्यावेळी आप्पासाहेब, तात्या-काकी गावक-यांच्या प्रेमापोटी अहोरात्र कष्ट घेतात. यामुळे गावक-यांचेही त्यांच्यावर प्रेम निर्माण होते. यातून जसे या कादंबरीचे कथानक साकार होते. तसेच जयवंत, उमा, आप्पासाहेब, तात्या-काकी यांच्या घरगुती खेळकर वातावरणांतूनही हे कथानक पूढे सरकते. पुढे दरोडा येणार म्हटल्या-वर सर्व गावकरी एकत्र येऊन दरोडा परतावून लावतात. पण त्यात आप्पा-साहेबांचा मृत्यू होतो. त्या पाठोपाठ काकी-तात्या यांचाही मृत्यू होतो. या नियती प्रधान घटनेमुळे गावचे तीन आधारस्तंभ नाहीसे होतात. म्हणून सा-या गावाला दुःख होते. म्हणून या ही कादंबरीचा शेवट शोकात्म आहे.

वरील "बारी" आणि "माझा गाव" कादंबऱ्यांची कथानके लक्षात घेता, "बारी" कादंबरीच्या कथानकाची गुंफण सुटसुटीत केलेली दिसून येते. त्यात कुठेही पाल्हाळीकपणा दिसत नाही. म्हणून "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरी अधिक चांगली वाटते. एका तेग्या बेरडाने आपल्या जीवनाची कर्म-कहानी केंव्हा सांगायला सुरवात केली, आणि स्वातंत्र्यप्राप्ती नंतर बदलत्या जीवनाशी मिळते-जुळते घेता येत नाही. म्हणून आधुनिक विचाराशी समरस असणारा ईश्वरा व तेग्या यांच्यात संघर्ष होतो. आणि शेवटी तेग्या एकाकी पडतो. येथे त्याची कर्मकहानी केंव्हा संपते हे कळत नाही. त्यामुळे ही कादंबरी वाचताना एखादी गोष्ट ऐकल्यासारखी वाटते. याउलट "माझा गाव" कादंबरी ही एका संपूर्ण गावची कथा असल्यामुळे, तीचे कथानक सुटसुटीत वाटत नाही. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीच्या कथानकात पाल्हाळीकपणा दिसून येतो. कादंबरीत इनामदारांच्या घरगुती वातावरणात तर पूर्ण पाल्हाळीकपणा दिसून येतो. तसेच जत्रेचा प्रसंग, सोने लुटण्याचा प्रसंग, हौसा-रावबा प्रकरणांचा प्रसंग यातही हा पाल्हाळीकपणा दिसून येतो. त्यामुळे कादंबरीतील संवादही पूर्ण टासळले आहेत. जयवंत,-उगा, जयवंत-तात्या, जयवंत-काकी, जयवंत-सारजा यांच्या संवादात तर काही अर्थच नाही. यांच्या संवादामुळे विनाकारण कादंबरीची लांबी वाढविली असे वाटते. त्यामुळे घटनाप्रसंगात कृत्रीमता दिसून येते. याच्या उलट "बारी" कादंबरीचे संवाद सुटसुटीत असल्यामुळे सहज समजतात. तसेच कथानकाची गुंफण सुरवातीपासून शेवटपर्यंत त्या-त्या घटना-प्रसंगाना अनुसरून व्यवस्थित केल्या-मुळे "बारी" कादंबरीचे कथानक भरीव वाटते. तेग्या व नागीची भेट झाल्या-नंतर नागीला पळवून आणण्याचा प्रसंग, बेरडांनी एकत्र जमुन रात्रीच्या वेळी गाड्या लुटण्याचा प्रसंग, इनामदाराच्या शपथेत अडकून तेग्याने केलेला पाटलाचा खून व त्याकरीता आपल्या जीवाभावाचा मित्र चंद्रोजी याचाही केलेला खून. याकरीता तेग्याला झालेली शिक्षा. पुढे तेग्या सुटून आल्यावर आपला

मुलगा ईश्वरा याचे लग्न मोठ्याथाटामाटात करून देतो, हा प्रसंग व त्याच-रात्री घराला आग लागून त्यात नागी भाजून मरते. हा प्रसंग व पुढे स्वतंत्र्य-प्राप्तीनंतर बदलत्या जीवनाशी समरस होणारा तेग्याचा मुलगा ईश्वरा. याकरीता तेग्यात आणि ईश्वरात होणारा संघर्षाचा प्रसंग व पुढे तेग्याला या बदलत्या जीवनाशी मिळते-जुळते घेता येत नाही म्हणून तेग्या एकाकी पडतो. इथेपर्यंतचे सर्व प्रसंग प्रत्ययकारी झाल्यामुळे "बारी" कादंबरीचे कथानक सुट-सुटीत व बांधेसूद वाटते. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरी सरस वाटते.

या दोन्ही कादंबऱ्यांचे शेवटही दु:खदायक वाटत असले तरी, "माझा गाव" कादंबरीच्या शेवटापेक्षा "बारी" कादंबरीचा शेवट प्रत्ययकारी वाटतो. कारण "माझा गाव" कादंबरीच्या शेवटामध्ये एकापाठोपाठ गावचे मुख्य तीन अधारस्तंभ जाणे. ही घटना कल्पनिक वाटते. तशी काल्पनिकता "बारी" कादंबरीच्या शेवटामध्ये दिसत नाही. कारण बदलत्या जीवनाशी समरस न होता आल्यामुळे बेरड जमातीचे उध्वस्त होऊ पाहणारे जीवन आणि त्यांची जगण्याची धडपड करणारे जीवन यात कुठेही काल्पनिकता येत नाही. त्यामुळे "माझा गाव" कादंबरी पेक्षा "बारी" कादंबरीचा शेवट प्रत्ययकारी वाटतो. अशा त-हेने "बारी" कादंबरी "माझा गाव" कादंबरीपेक्षा सरस ठरते.

"बारी" व "माझा गाव" आशयसूत्र:

"बारी" आणि "माझा गाव" या कादंबरींच्या कथानकामध्ये जसा फरक आहे. तसाच तो आशयाच्या बाबतही आहे.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बेरड जमातीच्या जीवनातील पारंपरिक मूल्ये कशी नष्ट होतात आणि बदलत्या परिस्थितीशी या जमातीला मिळते-जुळते घेता येत नाही हे "बारी" कादंबरीचे आशयसूत्र आहे.

बेळगाव जवळील सुतगट्टी गावाला जे घनदाट जंगल लागते, या जंगलाचा आधार घेऊन वाटमा-या करणा-या बेरडांच्या पारंपरिक जीवनाला स्वातंत्र्या-नंतरच्या काळात तोंडा पडतो. नवीन परिस्थितीशी जुळवून घेता येत नाही. त्यामुळे या जमातीत संघर्ष निर्माण होतो. हा संघर्ष आधुनिक विचाराशी सहमत असणारा तेग्याचा मुलगा आणि त्याचे तरुण साथीदार व परंपरा-वादी तेग्या आणि त्याचे जुने जोडीदार यांच्यात होतो. या संघर्षामुळे बेरडांच्या जीवनात फुट पडते. अशा त-हेने या जमातीची जगण्याची धडपड, धडपड आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून न घेता आल्यामुळे त्यांची पारं-परिक मुल्ये कशी नष्ट होतात. हेच या कादंबरीचे आशयसूत्र होय.

याच्या उलट "माझा गाव" कादंबरीचे आशयसूत्र दिसून येते. स्वातंत्र्य-पूर्व काळातील एक जुनं खेडेगाव "माझा गाव" कादंबरीमध्ये चित्रित केले आहे. त्या खेड्यातील इनामदार घराणे. त्या घराण्याचे गावावर असलेले वर्चस्व. इनामदारांच्या शब्दाला गावात असलेला मान. इनामदारांचीही गावा-करीता कष्ट करण्याची वृत्ती. त्यांचे गावावरील प्रेम. त्याचप्रमाणे गावातील ब्राह्मण वर्गाला असलेले महत्त्व. त्यांचे समाजसेवा विषयक कार्य, समाजशील वृत्ती. जाती-भेद न मानता लोकांची केली जाणारी सेवा. त्याकरीता गावातील लोकांना त्यांच्याबद्दल वाटणारा आदर. तसेच गावातील सामान्य लोक, शेतकरी कुळे, बलुतेदार आणि गावातील दलित वर्ग, यांनी आपआपल्या पायरीने राहण्याची रीत, या सर्वांच्या सहकार्याने चाललेला गावचा कारभार. गावातील देवधर्म, जत्रा, उत्सव यावेळचे परंपरागत मान-पान आणि अधिकार. गावातील स्टीप्रीय लोक. संकटकाळी, वेळप्रसंगी एकमेकांना कसे मदत करतात. या गावातील माणूस स्वत:ला समाजाशी कसा बांधून घेतो. प्रत्येक माणसांचा खेड्यातील दुस-या माणसांशी कसा संबंध असतो. म्हणजे एकूण गाव कसं जगत. हेच या कादंबरीचे आशयसूत्र आहे.

"बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंबरींची वरील आशयसूत्रे लक्षात घेता, "बारी"च्या आशयसूत्रामध्ये जशी बदलती समाज रचना दिसून येते. तशी बदलती समाज रचना "माझा गाव" च्या आशयसूत्रामध्ये दिसत नाही. हा या दोन कादंबरीच्या आशयसूत्रातील फरक होय.

## "बारी" व "माझा गाव" व्यक्तिचित्रणाची वैशिष्टये:

एखादा प्रसंग सांगताना रणजित देसाई तो प्रसंग संवाद रूपात सांगून त्यातील नाटय जिवंत करतात. मित्र व्यक्तिंच्या स्वभावातील अनेक बारकावे सहजपणे त्यांनी टिपलेले असतात. त्यांच्या या दोन कादंबरीतील व्यक्तींचा स्वभाव, संवादातील बारकावे, ठळक वर्णने ही त्यांच्या प्रत्यक्ष स्वभावाचाच कसा भाग आहे, याचा प्रत्यय या दोन्ही कादंबरीमध्ये येतो. तसे ते आपल्याला आलेला अनुभव "आनंद यादव" यांनी घेतलेल्या मुलाखतीत स्पष्ट करतात. "१९५४ साली मी कोवाडला शेती करण्यासाठी कोल्हापूरहून परत आलो. आपल्या इनामीची गावे आहेत तरी कशी हे पाहण्याच्या उद्देशाने मी "बारी"मधील तेग्याला बरोबर घेऊन मुक्काम, दर मुक्काम करतकरत, बेरडांबरोबर हिंडतफिरत, त्यांच्याबरोबर खातपीत, वस्ती करत चाळीस गाव हिंडलो. जंगलाचा, बेरडांच्या जीवनाचा, त्यांच्या जगण्याच्या त-हांचा, स्वभावांचा प्रचंड अनुभव आला. माझ्या बेरडांविषयीच्या कथा आणि "बारी" कादंबरी यातूनच आकाराला आली आहे आणि "माझा गाव"मधील बरीच पात्रे आणि प्रसंग तर माझ्या घरचेच आहेत." [१] म्हणजे एकूण कादंबरीतील मुख्य प्रसंग आणि पात्रे रणजित देसाईनी कल्पनेने तयार केलेली नसून प्रत्यक्षात जी अनेक माणसे त्यांनी पाहिली, अनेक प्रसंग पाहिले तसेच इतर व्यक्तीविषयी जे ऐकले, तीच पात्रे त्यांनी कादंबरीत योजून त्यांच्या जीवनात नव्याने मांडणी केली आहे. या दृष्टीने "बारी" व "माझा गाव" या दोन्ही कादंब-यातील व्यक्तिचित्रणांची वैशिष्टये तुलनात्मकदृष्टया पाहता काही गोष्टी स्पष्ट जाणवतात.

"बारी" कादंबरीतील "तेग्या" हा बेरडांचा मुख्य नायक आहे. त्याचा विचारानुसार सर्व बेरड वागत असतात. सुरवातीस तरुणपणामुळे त्यांच्या अंगात जोम असतो, राग असते म्हणून तो खून, दरोडे, चो-या करतो. याचप्रमाणे त्याचे जोडीदार काळू, चंद्रोजी, तुका, मल्ला याच प्रवृत्तीची माणसे आहेत. तसेच "नागी" ही तेग्याची पत्नी तेग्याप्रमाणेच प्रसंगी रागीट, तापट पण तितकीच मायाळू आहे. पण आधुनिक विचाराचा ईश्वरा व त्याचे जोडीदार ही पात्रे बेरडांच्या परंपरागत जीवनाशी समरस होत नाहीत. तर आप्पासाहेब इनामदार हे फसवे, कपटी आणि मग्रूर प्रवृत्तीचे पात्र "बारी"त आले आहे.

याच्या उलट "माझा गाव"मध्ये "आप्पासाहेब इनामदार" हे मुख्य पात्र आहे. संपूर्ण कादंबरी या व्यक्तिरेखेभोवती फिरते. हे सरकार इनामदार असल्यामुळे घरातील नोकर-चाकरापासून सारा गाव त्यांना मान देतो. असे हे श्रीमंत, वजनदार पात्र आहे. तसेच उमाच्या व्यक्तिरेखेतून एक खानदानी स्त्री उभी केली आहे. पण ती इनामदार घराण्यातील असली तरी घरच्या प्रमाणेच गावातील लोकांवरही तितकेच प्रेम करते. अशी ही आदर्श स्त्री रेखाटली आहे. तसेच तात्या जात-पात न मानता गोरगरीब, आजारी लोकांना मदत करतात. यावरुन त्यांची समाजशीलवृत्ती दिसून येते. तर रावबाच्या वागण्यातून उन्मतपणा दिसून येतो. कारण घरात उमा सारखी शुध्द सात्विक पत्नी असूनही तो बाहेरख्याली बनतो. आप्पासाहेबांच्या स्वभावाविरुध्द त्याचे वागणे आहे. त्यामुळे त्याचे वागणे इनामदारी घराण्याला शोभत नाही. तसेच हौसाचा स्वभाव स्त्री स्वभावाला धरुन नाही. म्हणूनच ती नव-याचा, समाजाचा विचार न करता रावबाशी संबंध ठेवते. तिचे हे वर्तन खेडेगावातील नीती विचाराशी सुसंगत नसल्याने ती वाईट वागणारी आहे असे सर्वांना वाटते. लेखकाने हौसाच्या चित्रणातून गावातील अनैतिक वर्तन करणा-या स्त्रीचे चित्र उभे केले आहे. त्याचप्रमाणे

जयवंताच्या व्यक्तिचित्रणातून त्याचे व्यक्तिमत्त्व ठेकर वाटते. पण कांही ठिकाणी विनाकारण पाल्हाळीकपणा वाढला आहे. त्यामुळे त्याच्या या ठेक्कर वृत्तीची अतिशयोक्ती होते. अशी ही "माझा गाव" कादंबरी मधील व्यक्तिचित्रणे आहेत.

वरील "बारी" आणि "माझा गाव" कादंबरीतील व्यक्तिचित्रणावरून हे स्पष्ट होते की, "बारी"तील "तेग्या" आणि "माझा गाव" मधील "आप्पासाहेब" हे नायक वेगवेगळ्या प्रवृत्तीचे दिसून येतात. म्हणून शंकर सारडा म्हणतात, "बारी"तला "तेग्या", "माझा गाव" मधील "आप्पा-साहेब" ही भिन्न सामाजिक थरातली माणसं असली, त्यांच्या कर्तृत्वाच्या वाटा वेगळ्या असल्या तर मूलत: ती एकाच मुशीतली माणसे आहेत." २ याप्रमाणे "बारी"तील "तेग्या" हा जातीने बेरड असल्यामुळे खून, दरोडे, चो-या करणे हा त्याच्या जीवनाचा स्थायी भाव आहे. त्यामुळे त्याचे व्यक्तिचित्रण ठसठसीपणातून कसदार झाले आहे. तर "माझा गाव" मधील आप्पासाहेब हे इनामदार असल्याने गावच्या भल्यासाठी कार्य करीत असतात. यातून त्यांचा कष्टाळूपणा, प्रेमळपणा हे गुण दिसून येतात. पण तेग्याचे व्यक्तिचित्रण जसे कसदार झाले आहे. तसे आप्पासाहेबांचे व्यक्तिचित्रण कसदार झालेले दिसत नाही. म्हणून "तेग्याचे" व्यक्तिचित्रण "आप्पासाहेबां-च्या" व्यक्तिचित्रणापेक्षा सरस ठरते. तसेच "बारी" मधील आप्पासाहेब इनामदार हे स्वार्थी, कपटी, फसवे असे मग्रूर दिसतात. पण "माझा गाव" मधील आप्पासाहेब तसे दिसत नाहीत. अशा त-हेने या दोन इनामदारांच्या मधील परस्परविरुध्द व्यक्तिचित्रण दाखवून फरक दाखविला आहे. यावरून "माझा गाव" मधील आप्पासाहेब इनामदार यांचे चांगले गुण तेवढे दाखविले आहेत. त्यामुळे हे पात्र रणजित देसाई यांच्या व्यक्तिमत्त्वाशी मिळते-जुळते आहे. त्यामुळे या पात्राचे उदात्तीकरण केल्याचे स्पष्ट दिसते. म्हणून तेग्याचेच व्यक्तिचित्रण सरस ठरते.

"बारी" मधील तेग्याचा मुलगा "ईश्वरा" हा हुशार असल्यामुळे स्वकर्तृत्वावर बारीतील बेरडांच्या परंपरागत जीवनात बदल करण्याचे कार्य करतो. त्यामुळे तो आधुनिक जीवनाचा पुरस्कर्ता ठरतो. तर "माझा गाव" मधील आप्पासाहेबांचा मुलगा "रावबा" वाईट वर्तन करतो म्हणून उन्मत्त वाटतो. म्हणून ईश्वराचे व्यक्तिमत्त्व चांगले वाटते. तसेच "बारी" कादंबरीमधील ईश्वराचा मुलगा "सिद्दा" या लहान मुलाच्या चित्रणामुळे कादंबरीतील वातावरण खेळकर वाटते. त्याचप्रमाणे "माझा गाव" कादंबरीमध्ये "जयवंत" या लहान मुलाच्या पात्राची निर्मिती करून कादंबरीत खेळकर वातावरण निर्माण केले आहे. पण जयवंतच्या पात्रात जास्त पाल्हाळीकपणा दिसून येतो. त्यामुळे सिद्दाचे पात्र वरचढ वाटते.

स्त्रियांच्या चित्रणाबाबतीतही "माझा गाव" पेक्षा "बारी"तील स्त्रिरेखा अधिक चांगल्या प्रकारे चित्रित केल्या आहेत. "बारी"तील "नागी", "लगमा" यांच्याप्रमाणेच "माझा गाव" मधील उमाचे व्यक्तिचित्रण प्रेमळ, पतिव्रता, सत्वशील असे आदर्श स्त्रीचे रेखाटन आले आहे. पण "नागी" आणि "लगमा" या बेरड वृत्तीच्या स्त्रियापुढे इनामदारी उमाचे स्त्री गुण फिके वाटतात. याही दृष्टीने "नागी" लगमा ह्या स्त्रीरेखा अधिक चांगल्या वाटतात.

"बारी" कादंबरीत जुन्या काळातील म्हातारा "मल्ला" हा बेरडांना योग्य तो सल्ला देवून त्यांच्या भवितव्याविषयी काळजी घेणारा चित्रित केला आहे. त्याचप्रमाणे "माझा गाव" मधील "तात्या" गावच्या भल्यासाठी कार्य करीत असतात. त्यामुळे ही दोन्ही पात्रे समाजशील वृत्तीची वाटतात. पण बेरड समाजाच्या दृष्टीने विचार करता, बारीतील बेरडवृत्तीचा "मल्ला" हा अधिक समजस वृत्तीचा वाटतो. बारीतील व्यक्तिचित्रणे वाङ्मयदृष्ट्या चांगल्या प्रकारे चित्रित केल्याचे दिसते.

"बारी" व "माझा गाव" सामाजिक चित्रण:

ग्रामीण माणसांच्या वैशिष्ट्यातून सामाजिक परिस्थितीचे चित्रण ग्रामीण कादंबरीमध्ये येणे अपरिहार्य असते. सामाजिक परिस्थितीच्या चित्रणाअभावी ग्रामीण कादंबरीत उणेपणा दिसून येतो. रणजित देसाई यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या दोन्ही कादंब-या ग्रामीण जीवनावर आधारीत असल्यामुळे, त्यांच्यातही सामाजिक चित्रण आले आहे. या दोन कादंबरींच्या सामाजिक जीवनाच्या चित्रणांचा तुलनात्मक अभ्यास करता, "माझा गाव" कादंबरीतील सामाजिक चित्रणापेक्षा "बारी" कादंबरीतील सामाजिकतेचे चित्रण अधिक प्रत्ययकारी झाले आहे. त्यामुळे "माझा गाव" कादंबरी पेक्षा "बारी" कादंबरी सामाजिक चित्रणाच्या बाबतीतही सरस ठरते.

"बारी" कादंबरीतील सामाजिक जीवनाचे चित्रण हे बेरड समाजाच्या परंपरागत जीवन क्रमातून दिसून येते. पांढरपेशी वर्गापासून दूर असलेली ही बेरड जमात पिढयानुपिढया कशी जगत आली आणि स्वातंत्र्यानंतर बदलत्या सामाजिक मुल्याशी या जमातीला मिळते-जुळते घेता येत नाही. यातूनच "बारी" कादंबरीमधील सामाजिक जीवनाचे चित्रण पहावयास मिळते. बेरड लोक आपल्या जीवीतार्थासाठी सर्वजन एकत्र मिळून रात्रीच्या वेळी गाडया लुटतात. चो-या करतात. तसेच आपल्या आनंदाच्या क्षणी गावात खेळ करतात. लग्नासारख्या धार्मिक विधीच्यावेळी हे बेरड एकत्र येवून कार्य करतात. जंगलाला लागलेली आग सर्वजन मिळून विझवतात. यासारख्या प्रसंगातून बेरडांचे परंपरागत सामाजिक जीवन जसे दिसून येते. तसेच स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर या बेरडांच्या परंपरागत जीवनात परिवर्तन होते. त्यामुळे तेग्याचा मुलगा ईश्वरा व त्याचे जोडीदार हे आधुनिक जीवनाचा स्वीकार करतात. त्यामुळे परंपरागत सामाजिक विचाराशी जखडून असलेला तेग्या,

आणि आधुनिक सामाजिक विचाराशी सहमत होणारा ईश्वरा यांच्यात संघर्ष निर्माण होते. अशा त-हेने या समाजाला जगण्याची असणारी धडपड भवितव्याविषयीची काळजी यातूनच बेरडांच्या सामाजिक जीवनाचे दर्शन होते.

याप्रमाणे "माझा गाव" कादंबरी सामाजिक जीवनाचे चित्रण आले आहे. "माझा गाव" मधील माणस एकटी-एकटी जगताना दिसत नाहीत. संकटकाळी, वेळप्रसंगी ही माणस एकमेकाला मदत करतात. म्हणूनच ती आप्पासाहेबांच्या वाड्यावर काही ना काही कामानिमित्त येत असतात व आप्पासाहेबांना मान देत असतात. आप्पासाहेबही गावच्या हितासाठी झटत असतात. म्हणूनच या गावचा कारभार व्यवस्थीत चाललेला दिसून येतो. याकरीता आप्पासाहेबांच्या घरची मंडळी, नोकर-चाकर, गावातील ब्राह्मण वर्ग, गरीब लोक, शेतकरी कुळे, बलुतेदार हे एकमेकाला सहकार्य करीत असतात. त्यामुळे गावातील देवपूर्जा, जत्रा, जत्रेतील कुस्त्या, दस-याच्या सनाचा उत्सव. यावेळी या गावचे लोक एकत्र येवून हे सन, उत्सव पार पाडत असतात. या सन, उत्सवाच्यावेळी या गावच्या इनामदाराना मान असतो. म्हणून गावकरीही परंपरागत पध्दतीनुसार त्यांना मान देतात. या आनंदाच्या प्रसंगातून सामाजिक जीवनाचे चित्रण जसे दिसून येते. तसेच ओल्या दुष्काळा-च्यावेळी, पटकीच्या साथीच्यावेळी, गावावर दरोडा येण्याच्यावेळी या गावचे लोक एकमेकांच्या मदतीला येतात. अशा त-हेच्या घटना-प्रसंगातून "माझा गाव" कादंबरीमधील सामाजिक जीवनाचे चित्रण दिसून येते.

वरील "बारी" आणि "माझा गाव" या कादंब-यातील सामाजिक जीवनाची पार्श्वभूमी लक्षात घेता, "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरीतील सामाजिकतेचे चित्रण अधिक प्रत्ययकारी झाले आहे. कारण "बारी" कादंबरीतील सामाजिक जीवन हे बेरडांच्या मागास जीवनातून साकार होते. "बारी" सारख्या ग्रामीण परिसरात असलेले बेरड जमातीचे

परंपरागत जीवन. या बेरडांच्या परंपरागत जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर बदलत्या समाजव्यवस्थेमुळे परिवर्तन होते. त्यामुळे ईश्वरा व त्याचे जोडीदार आधुनिक जीवनाचा स्वीकार करतात. यातून त्यांची जगण्याची धडपड, भवितव्याची काळजी दिसून येते. पण अशा पध्दतीची बदलती समाज रचना "माझा गाव" कादंबरीमध्ये दिसत नाही. "माझा गाव" कादंबरीमध्ये परं-परागत त्याच पध्दतीची सामाजिक रचना दिसून येते. त्यामुळे सामाजिक जीवन चित्रणाच्या बाबतीत "माझा गाव" कादंबरी कमी पडते. म्हणून भालचंद्र नेमाडे म्हणतात, "प्रदीर्घ अवकाश असलेली, आशयसूत्रांचे अनेक पदर असलेली, त्यामुळे विस्तृत संरचना मांडणारी, अशी कादंबरी अपरिहार्यपणे सामाजिक असते."[3] यादृष्टीने "बारी" कादंबरीचा विचार करता, बेरडांच्या जीवनाचा प्रदीर्घ अवकाश तिच्यामध्ये दिसून येतो. तसेच बेरडांचे परंपरागत जीवन आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे बदलते जीवन यातून "बारी" कादंबरीत आशयसूत्रांचे अनेक पदर दिसून येतात. त्यामुळे बेरडांच्या जीवनाची विस्तृत संरचना "बारी" कादंबरीत मांडली आहे. समाजजीवनाचे अधिक चांगले चित्रण बारी कादंबरीत चांगल्या रीतीने येते.

"बारी" व "माझा गाव" भाषाशैलीचे वैशिष्ट्ये:

ज्या परिसराचे चित्रण कादंबरीतून केलेले असते. त्या परिसरातील बोलीचा संवादासाठी उपयोग करणे हे प्रादेशिक कादंबरीचे वैशिष्ट्ये असते. "रणजित देसाई" यांचे "कोवाड" हे बेळगाव जवळील कोल्हापूर जिल्ह्यातील मूळ गाव. पण लहानपणी कोल्हापूरात ते आजीकडे राहायला होते. नंतर शेती करण्यासाठी "कोवाडला" आले. त्यामुळे त्यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या दोन्ही कादंबऱ्यामध्ये ग्रामीण आणि शहरी भाषेचे मिश्रण दिसते. पण ग्रामीण भाषाविषयक यादवांचे सूत्र असे आहे की, "एखादा निर्मितीपूर्व अनुभव निर्मितीसन्मुख होताना, ज्या भाषेची मागणी

करू शकेल त्या भाषेला निर्मात्याने निर्भीडपणे सामोरे गेले पाहिजे. वाचकांना ती भाषा कळेल किंवा नाही, याचा त्याने विचार करता कामा नये. प्रसंगी मग केवळ नागर भाषा, केवळ ग्रामीण भाषा किंवा दोहोंचे मिश्रण हे करावे लागते. आविष्कारू पाहणाऱ्या साहित्याच्या स्वभावावर ते अवलंबून असेल."[४] रणजित देसाई "बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंबरीत नेमके हेच सूत्र वापरतात. मात्र वाचकांना ती भाषा कळेल किंवा नाही, याचा त्याने विचार करता कामा नये. हे यादवांचे मत न पटणारे आहे. कारण देसाईंच्या या दोन्ही कादंबरीची भाषा कळेल अशीच आहे.

"बारी" कादंबरीतील भाषा ही सुतगट्टीच्या जंगलातील बेरडांच्या तोंडची बोली आहे. म्हणून त्यांच्या या बोलीची वैशिष्टये "बारी" कादंबरीत दिसतात. बेरडांचे कठोर उच्चार, शब्दोच्चारातील लय, बोलतांना त्यांचे होणारे शारीरिक हावभाव, बेरडांच्या बोलीतील म्हणी, वाक्प्रचार, शिव्या, गाणी, बेरडांच्या भाषेची विशिष्ट अशी धाटणी हे रणजित देसाईंनी बेरड जातीत प्रत्यक्ष मिसळून अनुभवले. त्यामुळे ही त्यांची वैशिष्टये "बारी" कादंबरीत दिसून येतात. तसेच "बारी" हा परिसर महाराष्ट्र-कर्नाटक या सीमा भागात असल्यामुळे, "बारी" कादंबरीत कन्नड भाषेचा प्रभाव काही प्रमाणात जाणवतो.

"नडी बाळ्या होगुन् पॅटॅगा
मारवाडी अंगड्याग"[५](पृ.३५)
"नी याक गंगा येन अंती
नीन्न मैली नान भीती.." [६](पृ.१७७)

यावरून बेरडांच्या भाषेवर कन्नड भाषेचा थोडाफार प्रभाव दिसून येतो. म्हणून "रणजित देसाई" यांनीही "बारी" या कादंबरीत मराठी-कन्नड या दोन्ही भाषेचा वापर केला आहे.

त्याचप्रमाणे "माझा गाव" या कादंबरीत कोल्हापूर जिल्हातील एक खेडेगाव चित्रित केले आहे. त्यामुळे त्या खेडेगावातील बोलीचा, शब्दांचा, म्हणींचा, वाक्प्रचारांचा तसेच विशिष्ट अशा गावातील बोलीच्या धाटणीचा लेखकाने वापर केला आहे. त्याकरीता या गावातील इनामदार घराणे, त्या इनामदारांचे वागणे, बोलणे तसेच या गावातील लोकांचे वागणे, बोलणे यातून खेडेगावातील बोलीभाषेची वैशिष्टये प्रकट होतात. रणजित देसाई लहानपणी कोल्हापूरात असताना त्यांचा संबंध राजघराण्याशी आलेला होता. लहानपणी ते राजेराजवाडे यांच्याबरोबर फिरले असता तेथील व्यक्तींची बोलणी, संभाषणे, वर्तन क्रियाप्रतिक्रिया या सर्व गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे त्यांनी "माझा गाव" कादंबरीमध्ये त्याच भाषेचा वापर केला आहे.

"बारी" आणि "माझा गाव" कादंबऱ्यामध्ये शिवी गाळीचा वापर दिसून येतो.

"ह्या माकडाला देतूस मला त्वांड बघ त्येचं..."[७] (पृ.७)
"अरं तेग्या ती रांड पळाली रं !"[८] (पृ.१४)

या प्रकारच्या शिव्या जशा बेरडांच्या बोलीत आल्यात. त्याचप्रमाणे "माझा गाव" कादंबरीमध्ये शिव्यांचा वापर आलेला आहे.

"मरेना इनामदार ! तुम्हाला काय सोयर सुतक ? हरामखोर लेकाचे"[९] (पृ.१४) "च्या...पला, खोटं बोलतोस....!"[१०] (पृ.९७)

अशा प्रकारे या दोन्ही कादंबरीत शिव्याचा वापर दिसून येतो. पण याबाबतीत ना.सी. फडके यांनी खंत व्यक्त केली आहे. "ग्रामीण कथा लिहिणाऱ्यांनी खेडवळ भाषेचा आणि शिवी-गाळीचा वापर कलात्मकतेचा भंग न होईल, इतक्या बेताने करावयास हवा. परंतु हे अवधान सुटत चाललेले दिसते."[११] अशी खंत ना.सी. फडके यांनी जरी व्यक्त केली असली तरी ते कलावादी भूमिकेतून विचार करतात. त्यामुळे कादंबरीतील आशयापेक्षा

तंत्राचे मोठेपण त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. वास्तविक आशयानुरूप भाषा येणे हे स्वाभाविक असते. कादंबरीतील आशय अधिक समृध्द करण्यासाठी शिव्यांचा वापर कादंबरीकाराने केलेला असला तर ते अक्षेपार्ह नसते .

वरील "बारी" आणि "माझा गाव" कादंबरीतील भाषाशैलीचा विचार करता, "माझा गाव" कादंबरीतील भाषेपेक्षा "बारी" कादंबरीतील भाषा अधिक सरस ठरते. कारण "बारी" कादंबरीतील भाषा ही खास बेरडांची भाषा आहे. त्यामुळे बेरडांच्या भाषेतील कठोरपणा, रोखठोकपणा स्पष्ट दिसतो. अशी भाषेची स्पष्टता "माझा गाव" कादंबरीमध्ये दिसत नाही. म्हणून "माझा गाव" कादंबरीतील भाषेपेक्षा "बारी" कादंबरीतील भाषा अधिक सरस ठरते.

"बारी" व"माझा गाव" निवेदन शैलीचे वैशिष्ट्ये :

"रणजित देसाई" यांनी आपल्या या दोन्ही कादंबऱ्यामध्ये निवेदनासाठी नागर भाषा वापरतात व पात्रांच्या तोंडी त्या-त्या प्रदेशातील ग्रामीण बोली भाषाच राहू देतात. तसेच संवादाबरोबर या दोन्ही कादंबरीचे निवेदनही कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्याच्या परिसरातील मराठी ग्रामीण बोलीतच आहे. अशा तऱ्हेने निवेदनाची भाषा नागर असल्याने वाचकांना त्या विशिष्ट परिसरातील भाषेचे आकलन होण्यास मदत होते आणि पात्रांच्या तोंडची भाषा त्या-त्या परिसरातील बोली असल्याने पात्रांच्या चित्रणात अधिक अस्सलपणा येतो. ग्रामीण अगर प्रादेशिक कादंबरीतील निवेदन हे ग्रामीणच असावे. अशा प्रकारचा आग्रह आनंद यादव धरतात. पण तसे झाल्यास आकलनात अडथळा येतो, म्हणून रणजित देसाई यांच्या "बारी" आणि "माझा गाव" या कादंबऱ्यातील निवेदनाची भाषा नागर स्वरूपाची असल्याने ते योग्यच आहे. निवेदनाच्या बाबतीत हे जरी साम्य या दोन्ही कादंबरीत दिसत असले, तरी एक महत्त्वाचा फरकही दिसून येतो.

"बारी" कादंबरीचे संपूर्ण निवेदन हे तृतीय पुरुषी निवेदन आहे. तर "माझा गाव" कादंबरीमध्ये पहिल्या प्रास्ताविक प्रकरणात आणि शेवटच्या बावीसाव्या प्रकरणात प्रथम पुरुषी निवेदन आले आहे व मधल्या संपूर्ण एकवीस प्रकरणांत तृतीय पुरुषी निवेदन आले आहे. असा निवेदनाच्या बाबतीत या दोन कादंबरीत फरक दिसून येतो.

"बारी" कादंबरीचा आशय बेरड जमातीच्या जीवनाचे चित्रण करणारा आहे. कथानकाचा काळ गतकालीन आहे. पण कादंबरी वाचतांना आपणास कादंबरीत चित्रित केलेल्या घटना आपण प्रत्यक्ष अनुभवत आहोत, अशा प्रकारचा भास आपणास होतो. त्यामुळे कादंबरीतील घटना-प्रसंग वर्तमानात घडत आहेत असे आपणास वाटते. त्यामुळे "माझा गाव" कादंबरी-पेक्षा "बारी" कादंबरी निवेदनाच्या बाबतीतही वरचढ ठरते.

सारांश:

एका उपेक्षीत बेरड जमातीच्या जीवनात स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कोणता बदल होतो. हे "बारी" कादंबरीचे कथासूत्र आहे. तर परंपरागत खेड्यात-तील सरकारी इनामदार घराणे, आणि त्या घराण्यावर आधारीत असलेले खेड्यातील लोक. हे कसे जीवन जगतात हे "माझा गाव" कादंबरीचे कथासूत्र आहे. या दोन्ही कादंबरींच्या कथासूत्रांची अखेर शोकात्म आहे. पण "बारी" कादंबरीच्या कथासूत्राची गुंफण प्रत्ययकारी झाली आहे. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीपेक्षा "बारी" कादंबरी सरस ठरते.

"बारी" व "माझा गाव" या दोन कादंबरींची आशयसूत्रे लक्षात घेता, "बारी" कादंबरीच्या आशयसूत्रामध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जशी बदलती समाजव्यवस्था दिसून येते. तशी बदलती समाजव्यवस्था "माझा गाव" कादंबरीच्या आशयसूत्रात दिसत नाही. म्हणून आशयसूत्राच्या दृष्टीनेही "बारी" कादंबरी वरचढ ठरते.

या दोन्ही कादंबरीतील व्यक्तिचित्रणे ही लेखकांच्या प्रत्यक्ष अनुभवातून आकाराला आली आहेत. "बारी"तील तेग्या, काळू, चंद्रोजी, ईश्वरा, नागी या पात्रांच्या व "माझा गाव" मधील आप्पासाहेब, तात्या, उमा, जया, रावबा, हौसा या पात्रांच्या जनमानसात दृढमूल असलेल्या प्रतिमांना देसाईंनी धक्का लावलेला नाही. या दोन्ही कादंब-यातील माणसे भिन्न सामाजिक थरातली असली. त्यांच्या कर्तृत्वाच्या वाटा वेगवेगळ्या असल्या तरी ती एकाच मुशीतली माणसे आहेत. हा त्यांचा व्यक्तिचित्रणाचा विशेष या दोन्ही कादंब-यात दिसून येतो. पण "बारी" कादंबरीतील पात्राची व्यक्तिचित्रणे ही ठसठसीत आणि कसदार झाल्यामुळे ती "माझा गाव" कादंबरीमधील व्यक्तिचित्रणापेक्षा अधिक चांगली वाटतात.

"बारी" आणि "माझा गाव" या दोन कादंब-यांतील सामाजिक जीवनाचे चित्रण लक्षात घेता, "बारी" कादंबरीत बेरडांच्या जीवनात जशी बदलती समाजव्यवस्था स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दिसून येते. तशी बदलती समाजव्यवस्था "माझा गाव" कादंबरीमध्ये दिसून येत नाही. त्यामुळे "माझा गाव" कादंबरीच्या कलात्मकतेत उणीव दिसून येते. ती उणीव "बारी" कादंबरीत दिसत नाही. म्हणून सामाजिक जीवन चित्रणाच्या बाबतीतही "बारी" कादंबरी वरचढ ठरते.

"बारी" आणि "माझा गाव" कादंबरीतील भाषाशैलीचा विचार करता, "बारी" कादंबरीतील भाषा ही सुतगट्टीच्या जंगलातील बेरडांच्या तोंडची बोली आहे. त्यामुळे बेरडांच्या भाषेतील कठोरपणा, रोखठोकपणा स्पष्ट दिसतो. अशी भाषेची स्पष्टता "माझा गाव" कादंबरीमध्ये दिसत नाही. म्हणून भाषा शैलीच्या दृष्टीनेही "बारी" कादंबरी सरस ठरते.

"बारी" कादंबरीचे संपूर्ण निवेदन हे तृतीय पुरुषी निवेदन आहे. तर "माझा गाव" कादंबरीमध्ये प्रथम पुरुषी आणि तृतीय पुरुषी निवेदनाचा वापर

केला आहे. त्यामुळे निवेदनाच्या बाबतीत विसंगती दिसून येते. तशी विसंगती "बारी" कादंबरीत दिसून येत नाही. म्हणून निवेदनाच्या बाबतीत-ही "बारी" कादंबरी सरस ठरते. अशा त-हेने कथानक, आशयसूत्र, व्यक्ति-चित्रण, समाजजीवनाचे चित्रण, भाषाशैली, निवेदन ही वैशिष्टये "बारी" कादंबरीत नीटपणे व्यक्त होतात. त्यामुळे वाङ्मयदृष्टया "बारी" कादंबरी अधिक चांगली वाटते.

......

## प्रकरण चौथे

### संदर्भ

१) आनंद यादव, "मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती १९८५, पृ.१७१.

२) शंकर सारडा, "काही पुस्तके, काही लेखक पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ३७, ३८.

३) भालचंद्र नेमाडे, "कादंबरी" मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा. गो.मा.पवार, म.द. हातकणंगलेकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई,१९८८, पृ. २४.

४) तत्रैव, उपरोक्त, पृ. ४८.

५) रणजित देसाई, "बारी" मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, तिसरी आवृत्ती, ४ जानेवारी १९८८, पृ. ७.

६) तत्रैव, पृ. १७७.

७) तत्रैव, पृ. ७.

८) तत्रैव, पृ. १४.

९) रणजित देसाई, "माझा गाव" अनिलकुमार मेहता, प्रकाशक अजब पुस्तकालय, कोल्हापूर, द्वितीयावृत्ती ११ ऑगस्ट १९८०, पृ.१४.

१०) तत्रैव, पृष्ठ ९७.

११) ना.सी. फडके,"प्रतिभाविलास", पृ. १९९.

.....